# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

**CB/44/2026**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक **२०/०७/२०२६** |
|---|---|

**‘ नवी मुंबई गुन्हे शाखा कक्ष-३ पनवेल यांनी ०९ सोनसाखळी, ०१ घरफोडी व ०२ वाहन चोरीच्या गुन्हयातील आरोपींना केली अटक ’**

श्री.मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.दीपक साकोरे, पोलीस सह आयुक्त, श्री.प्रमोद शेवाळे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) व श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात घडलेले मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ३७९/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०९(६), ३(५) या गुन्हयाचा गुन्हे शाखा कक्ष ३ व मध्यवर्ती कक्ष यांच्या संयुक्त पथकाने गोपनिय बातमीदारांकडुन प्राप्त खात्रीशीर माहितीवरुन तसेच सी.सी.टी.व्ही. फुटेज व तांत्रिक तपास करुन सदरचा गुन्हा १) सहजद मोहम्मद सुधु शाह उर्फ सज्जु, वय २६ वर्षे, सध्या रा.प्लॉट क्र. ६०१, तुलसी अपार्टमेंट, तुलसी हॉस्पीटल जवळ, नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड. मुळ रा.घर क्र. ३३१, गल्ली क्र. ४/ए, एकता विहार, विठापुर विस्तार, बदरपुर, दक्षिण दिल्ली व २) हैदर शौकत शेख, उर्फ वन्या, वय २६ वर्षे, सध्या रा. इराणी वस्ती,अंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे, मुळ रा. भैयावाडी, शिवाजीनगर, जि. पुणे यांनी केला असल्याचे तपासामध्ये निष्पन्न केले. सदरचे आरोपी हे नवी मुंबई, कल्याण, कर्जत, नेरळ व ठाणे या भागात राहत असल्याने त्यांचा शोध घेणे आव्हानात्मक होते. त्यांना दि.२८/०६/२०२६ रोजी अटक करुन त्यांच्याकडुन सोनसाखळी चोरीचे एकुण ०८ व मोटारसायकल चोरीचे २ गुन्हे उघडकीस आणले आहे. तपासात आरोपींकडुन ६,००,०००/- रूपये किंमतीचे ४० ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले आहे. अटक आरोपी सहजद शाह याच्यावर यापुर्वी २७ व हैदर शेख याच्यावर १० गुन्हे दाखल आहेत.

**- सदर गुन्हयातील अटक आरोपी कडुन उघडकीस आणलेले गुन्हे -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुरनं व कलम |
|---|---|---|
| १ | पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई | ३७९/२०२६, BNS ३०९(६), ३(५) |
| २ | पनवेल शहर पोलीस ठाणे, नवी मुंबई | १४२/२०२६, BNS ३०९(६), ३(५) |
| ३ | खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई | २३३/२०२६, BNS ३०९(४), ३(५) |
| ४ | खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई | ४५/२०२६, BNS ३०९(४) |
| ५ | कळंबोली पोलीस ठाणे, नवी मुंबई | ४१/२०२६, BNS ३०९(६) |
| ६ | वागळे ईस्टेट पोलीस ठाणे, ठाणे शहर | १८४/२०२६, BNS ३०९ |
| ७ | कापुरबावडी पोलीस ठाणे, ठाणे शहर | २८४/२०२६, BNS ३०९ |
| ८ | शिवाजीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर | १५१/२०२६, BNS ३०९ |
| ९ | कोपरखैरणे पोलीस ठाणे, नवी मुंबई | ३०१/२०२६, BNS ३०३(२) |
| १० | हिललाईन पोलीस ठाणे, ठाणे शहर | ११०/२०२६, BNS ३०३(२) |

तसेच पनवेल शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ४५३/२०२६, भा.न्या.सं. कलम ३०९(६), ३(५) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये घटनास्थळापासुन ते उरण नाका, पनवेल पर्यंत जवळपास ७० ते ८० सी.सी.टी. व्ही. फुटेज तपासुन सदरचा गुन्हा हा ०३ विधीसंघर्षग्रस्त बालकांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. प्राप्त सी. सी.टी.व्ही.फुटेजच्या तांत्रिक तपासाव्दारे तिन्ही विधिसंघर्षग्रस्त बालकांची ओळख पटविण्यात आली. नमुद

विधिसंघर्षग्रस्त बालक हे शिळफाटा, जि. ठाणे परिसरात मिळुन आले. नमुद गुन्हयातील जबरीने खेचुन चोरी केलेली २,१०,०००/- रुपये किंमतीची ३० ग्रॅम सोन्याची चैन हस्तगत करण्यात आलेली आहे.

तसेच पनवेल शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ४७३/२०२६, भा.न्या.सं. कलम ३३१(३),३०५ या घरफोडी चोरीच्या गुन्हयाचे घटनास्थळी मिळुन आलेले अज्ञात आरोपींचे चान्सप्रिंटचे (बोटांचे ठसे) नमुणे अंगुलीमुद्रा तज्ञांकडुन प्राप्त करून तसेच त्या चान्सप्रिंटचा अहवाल प्राप्त करून आरोपी विकाशकुमार दिनेश यादव, वय ३३ वर्षे, मुळ रा. अकदोनी खुर्द, पोस्ट बनियाडीह, पोलीस ठाणे मुखसिल, जि. गिरिडीह, झारखंड यास निष्पन्न केले. त्यानंतर तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने आरोपीला झारखंड येथुन अटक केली आहे. त्याचेकडुन एकुण ८,००,०००/- रूपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे. नमुद आरोपीने आणखी काही गुन्हे केले आहेत का याचा तपास चालू आहे.

सदरची उल्लेखनिय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती प्रेरणा कट्टे, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ०३ पनवेलचे वपोनि/तानाजी भगत, सपोनि/सत्यवान बिले, पोउपनि/अभयसिंह शिंदे, पोउपनि/प्रसाद पाटील, सपोउपनि/अनिल पाटील, सपोउपनि/रमेश शिंदे, पोहवा/प्रशांत काटकर, पोहवा/प्रमोद राजपुत, पोहवा/अजित पाटील, पोहवा/निलेश पाटील, पोहवा/सागर रसाळ, पोहवा/दिपक डोंगरे, पोहवा/इंद्रजित कानु, पोहवा/रूपेश पाटील, पोहवा/अजिनाथ फुंदे, मपोहवा/हिरकणी पवार, मपोना/विनया पाटील, पोशि/लवंकुश शिंगाडे, पोशि/प्रसाद घरत व पोशि/विक्रांत माळी यांनी केली आहे.

★★★★★★★★★★